निशाणी ०१ वरील आदेश

अर्जदार क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जदारांच्या अर्जाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, रुम नं.६२८, बिल्डींग नंबर १५, म्हाडा कॉलनी, माहिम मच्छिमार नगर, माहिम पश्चिम, मुंबई १६ सदर मिळकत अर्जदार क्र.०१ यांचे वडील चंद्रकांत श्रीपत नाईक यांच्या नावे आहे. ते दिनांक २९/०६/२०२० रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.०१ ही मयत चंद्रकांत श्रीपत नाईक यांची मुलगी व अर्जदार क्र. २ ही पत्नी असून ते सरळ वारस आहेत. वर नमूद मिळकतीस वारसकामी नोंद करण्याकरीता चौकशी केली असता त्यांनी चंद्रकांत श्रीपत नाईक यांचा वारसा दाखला घेवून येण्याबाबत कळविले. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत चंद्रकांत श्रीपत नाईक यांनी सदर मिळकतीबाबत कोणतेही इच्छापत्र, मृत्यूपत्र किंवा व्यवस्थापन अगर तत्सम लेख लिहून ठेवलेला नाही. त्यांनी अन्य कोणत्याही न्यायालयात चंद्रकांत श्रीपत नाईक यांचे वारस असलेबाबत दाखल मिळणेसाठी अर्ज दाखल केला नसल्याचे सांगितले आहे. म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला की, अर्जदार क्र. १ व २ हेच मयत चंद्रकांत श्रीपत नाईक यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. न्यायालयाने अर्जदारामार्फत दैनिक वृत्तपत्र प्रहार या वर्तमान पत्रामध्ये दि.१८/११/२०२२ रोजी जाहिर प्रगटन निशाणी क्र.१० प्रमाणे प्रसिध्द केले होते व हरकती मागवल्या होत्या. परंतु, जाहिर प्रगटन प्रसिध्द होऊन देखिल कोणीही, कोणत्याही प्रकारे, कोणतीच हरकत अर्जदाराच्या अर्जाला घेतलेली नाही.

४. अर्जदार क्र.१ स्वप्ना नयन गावडे हिने तिचा पुरावा निशाणी क्र.११ प्रमाणे दिला आहे. त्यांनी पुराव्यात अर्जाशी सुसंगत अशी कथने केली आहेत. अर्जदाराच्या तोंडी पुराव्याला निशाणी क्र. १९ वरील मृत्यू प्रमाणपत्र, निशाणी क्र.१४ व १५ कडे सरपंच व पोलीस पाटील आरोंदा यांनी दिलेला दाखला हा पुरक पुरावा आहे. अर्जदार क्र. १ व २ यांना मयत यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे दिसून येते. अर्जदार यांनी नि.क्र.२० प्रमाणे पुरशिस दाखल केली आहे. त्यात त्यांनी फक्त वारस असल्याचा दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) निर्गमित करण्यात यावे असे नमुद केले आहे.

५. निशाणी क्र. १० चे जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन देखिल कोणीही आजपर्यंत कोणत्याही प्रकारे अर्जदारांच्या अर्जाला कोणताच आक्षेप नोंदवलेला नाही. अर्जदार क्र.१ व २ यांनी केलेला अर्ज, दिलेला पुरावा, दाखल केलेली कागदपत्रे व वरील कारणावरुन अर्जदार क्र.१ व २ यांनी केलेला अर्ज सिध्द झालेला आहे. त्यामुळे, अर्जदार क्र.१ व २ हे वारसप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्जदार क्र.१ व २ यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

:: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ स्वप्ना नयन गावडे पुर्वाश्रमीची स्वप्ना चंद्रकांत नाईक व २. चंद्रकला चंद्रकांत नाईक हे मयत चंद्रकांत श्रीपत नाईक यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र अपेंडीक्स–बी प्रमाणे देण्यात यावे.

४. अर्जदाराने नियमाप्रमाणे लागणारी कोर्ट फि न्यायालयात जमा करावी.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2023.06.19 11:12:29 +0530

( टी. एच. शेख )

दिनांकः १७/०६/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
कणकवली.